**नवी मुंबई महानगरपालिका**

**<u>मा.प्रशासक तथा आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**बुधवार, दिनांक २४ जून २०२० रोजी भरलेल्या सभेतील मंजुर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे:-**

| | |
|---|---|
| विषय क्र.०१. दि. २४ जून २०२० | सार्वजनिक रुग्णालय-ऐरोली व नेरुळ यांची क्षमता १०० बेड वरुन ३०० बेड करणेबाबत, आयुक्तांचे दिनांक २३/०६/२०२०, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/आरोग्य/६३६४/२०२०. |
| ठराव क्र.३५. | " उपरोक्त संदर्भात सार्वजनिक रुग्णालय-ऐरोली व नेरुळ यांची क्षमता १०० बेड वरुन ३०० बेड करणेबाबत कोव्हिड-१९ नियंत्रण व प्रतिबंध मोहिमेच्या पार्श्वभूमीवर, नॉन कोव्हिड रुग्णांच्या प्रभावी व्यवस्थापनेकरीता सार्वजनिक रुग्णालय-ऐरोली व नेरुळ येथील इमारतीमध्ये उपलब्ध असलेल्या जागेमध्ये १०० बेड रुग्णालयाचे रुपांतर ३०० बेड रुग्णालयामध्ये करण्याचा धोरणात्मक निर्णय व त्याअनुषंगाने उपरोक्त अ.क्र. १ ते ११ अन्वये नमुद केलेली कार्यवाही करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ६७(३)(क) अन्वये मा. प्रशासक यांची प्रशासकीय मंजूरी देण्यात यावी.” |
| निर्णय :- | ठराव करण्यात येतो की,<br>सार्वजनिक रुग्णालय-ऐरोली व नेरुळ यांची क्षमता १०० बेड वरुन ३०० बेड करणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक ३५ अन्वये कोव्हिड-१९ नियंत्रण व प्रतिबंध मोहिमेच्या पार्श्वभूमीवर, नॉन कोव्हिड रुग्णांच्या प्रभावी व्यवस्थापनेकरीता सार्वजनिक रुग्णालय-ऐरोली व नेरुळ येथील इमारतीमध्ये उपलब्ध असलेल्या जागेमध्ये १०० बेड रुग्णालयाचे रुपांतर ३०० बेड रुग्णालयामध्ये करण्याचा धोरणात्मक निर्णय व त्याअनुषंगाने उपरोक्त प्रस्तावातील अ.क्र. १ ते ११ अन्वये नमुद केलेली कार्यवाही करण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ६७(३)(क) अन्वये मा. प्रशासक यांची प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. |

सही/-
**(चित्रा बाविस्कर)**
**नगरसचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**

सही/-
**(अण्णासाहेब मिसाळ)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**नवी मुंबई महानगरपालिका**